सं.फौ.ख. क्र. ५९३/२०२५

निशाणी –

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २५१ नुसार आरोपीस सांगावयाचा अपराधाचा तपशील

**घोडनदी शिरुर येथील न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग यांचे न्यायालयात**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक. | : ०२/११/२०२१ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक. | : १७/०१/२०२२ |
| ३. | फिर्यादीचे नांव, वय, व्यवसाय व त्याचे निवासस्थान इत्यादी. | : **श्री. तुषार भगवंत बोरगे,** वय– ३५ वर्षे, व्यवसाय – शेती रा.वाडेगव्हाण, ता. पारनेर, जि. अहमदनगर |
| ४. | आरोपीचे नांव, वय व निवासस्थान इत्यादी. | : **रविंद्र जनाजी सोनवणे,** वय – ३८ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. वाडेगव्हाण, ता. पारनेर, जि. अहमदनगर |
| ५. | अपराधाचा तपशील. | : |

तुम्ही फिर्यादीस कायदेशिर देणे असलेल्या रकमेच्या संपूर्णपणे अगर अंशतः परतफेडीसाठी तुमचे खाते असलेल्या येस बँक, शाखा शिरुर या बँकेचे दिनांक ०२/११/२०२१ व दि. ३०/११/२०२१ रोजीचे रक्कम रु.३,६४,०००/– (रक्कम रु. तीन लाख चौंशष्ट हजार मात्र) व रक्कम रु.१,३६,०००/– (रक्कम रु. एक लाख छत्तीस हजार मात्र) चे दोन धनादेश क्रमांक– ०९२७७९ व ०९२७७७ हे फिर्यादीस दिला. फिर्यादीने सदरचा धनादेश वटण्यासाठी त्याचे खाते असलेल्या एच.डी.एफ.सी बँक शाखा शिरुर येथे जमा केला असता सदरचा धनादेश दिनांक १५/११/२०२१ व दि. ०२/१२/२०२१ रोजी "Funds insufficient" अशा शेऱ्यासह नाकारला गेला व मेमोसह फिर्यादीस परत मिळाला. त्यानंतर फिर्यादीने दिनांक १४/१२/२०२१ रोजी तुम्हांस वकिलामार्फत रजिस्टर पोस्टाने धनादेशाच्या रकमेची मागणी नोटीस पाठविली.

तुम्ही ती नोटीस स्वीकारली. त्यानंतरही तुम्ही मुदतीत फिर्यादींच्या मागणीप्रमाणे धनादेशाची रक्कम फिर्यादीस दिली नाही व त्याव्दारे तुम्ही भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ च्या कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केलेला आहे.

६. अपराधाचे प्रतिकथन.

प्र.१. तुला फिर्यादीची प्रत मिळाली का?

उत्तर. होय.

प्र.२. तुला अपराधाचा तपशील समजला का?

उत्तर. होय.

प्र.३. तुला अपराध कबूल आहे काय?

उत्तर. नाही.

प्र.४. तुम्ही प्ली बार्गेनिंगचा पर्याय वापरण्यास तयार आहात काय ?

उत्तर. नाही.

................................

**(आरोपीची सही/अंगठा.)**

**समक्ष,**

**दिनांक ०२/०७/२०२६.**

**(ए. जी. तांबोळी)**
**न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,**
**न्यायालय क्र. ४, घोडनदी, शिरुर.**